MHST200011012020

## वि.दि.दा.क्र.१८३/२०२३ मधील निशाणी क्र.४६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तुर्तातुर्त ताकीद अर्जावर निकाल होईपावेतो प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी दावा मिळकतीतील परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी असा आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

३) वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रं.१ याने त्यांच्या नावे दि.२९.११.२०१३ रोजी विसार पावती नावाचा साठेखत करारनामा लिहुन दिला होता. सदर करारनाम्यानुसार वादीकडुन प्रतिवादी क्रं.१ याने रक्कम रु.३३,२५,०००/- स्वीकारलेली आहे. वादींनी प्रतिवादी क्रं.१ यास वकिलांमार्फत नोटीस पाठवुन पुर्तता करुन खरेदीखत करुन देण्याची मागणी केली होती. सदर नोटीसीस उत्तर देऊन प्रतिवादी क्रं.१ याने व्यवहार मान्य करुन खरेदीखत करुन देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु, दि.२७.०१.२०२२ रोजी प्रतिवादी क्रं.१ याने दावा मिळकत प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांना खरेदीपत्राने तबदील केली. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. तसेच दाव्यामध्ये वादींना यश येण्याची पुर्ण खात्री आहे. प्रतिवादी क्रं.२ ते ५ हे दावा मिळकतीत बांधकाम करीत आहेत. त्यामुळे वादींचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होत आहे. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करावा.

४) प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज

चुकीचा व बेकायदेशीर आहे. तसेच वादींचा दावा मिळकतीतील परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याबाबतचा नि.३३ वरील अर्ज यापुर्वीच न्यायालयाने नामंजुर केलेला आहे. सदर आदेशाविरुद्ध त्यांनी वरिष्ठ न्यायालयात दाद मागितलेली नाही. प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी दावा मिळकत पुर्ण काळजी करुन खरेदी घेतलेली आहे व सदर मिळकतीचा कायदेशीर उपभोग घेण्याचा त्यांना पुर्ण हक्क आहे. वादींचा दावा मुदतबाहय आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नाहीत. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करावा.

५) प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांच्या विद्वान वकिलांनी त्यांची भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **आनंद लक्ष्मी एंटरप्रायझेस वि. वसंत बाळु म्हात्रा, एमएच.एल.जे. २००९(१) ४४५** व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **काशी मठ संस्थान वि. श्रीमद सुधींद्र तीर्थ स्वामी, ए.आय.आर. २०१० एस.सी. २९६** या न्यायनिवाडयांवर ठेवलेली आहे. परंतु, सदर दोन्ही न्यायनिवाडयांमधील वस्तुस्थीती ही सदर प्रकरणातील वस्तुस्थीतीशी मिळती जुळती नसल्याने सदर न्यायनिवाडयांचा सन्मान राखुन ती या प्रकरणास लागु होत नाहीत असे मला वाटते.

६) दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा अर्ज वादींनी नि.३३ ला दाखल केला होता. सदरचा अर्ज दि.१८.१२.२०२३ रोजी माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नामंजुर केलेला आहे. सदरचा अर्ज निर्णीत करताना दाव्याच्या गुणावगुणावर कोणतेही कथन करणे योग्य ठरणार नाही असे मला वाटते. त्यामुळे सदरचा दावा मुदतबाहय आहे किंवा कसे याबाबत कोणतेही कथन करणे योग्य ठरणार नाही.

७) प्रस्तुतचा अर्ज दाखल करताना वादींनी परिस्थितीमध्ये कोणता बदल झालेला आहे याबाबत अर्जात कथन केलेले नाही. तसेच वादींनी दावा मिळकतीतील बांधकामाबाबतची जी काही छायाचित्रे दाखल केलेली आहेत त्यामध्ये स्लॅब

लेव्हलपर्यंत बांधकाम पुर्ण झालेचे दिसुन येते. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. उलटपक्षी, वादींना सदर बांधकाम पाडुन मागण्याबाबत हुकूमात्मक ताकीद मागण्याची मुभा उपलब्ध आहे. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

**आदेश**

(१) अर्ज (नि.४६) नामंजुर करण्यात येतो.

(२) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.04.01 12:47:34 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : २९.०३.२०२५

(ए. ए. पाचरण)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.